# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 18/09/2021 (शनिवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत मंगळवारीपेठ रेलवेस्टेशन झोपडपटटी उमरेड येथे फिर्यादी नामे- लक्ष्मण सखाराम मांडले वय 23 वर्ष, रा. मंगळवारीपेठ रेलवेस्टेशन झोपडपटटी उमरेड हे 08 दिवसांपासुन आशिष दमके, रा. धुरखेडा यांचे घरी राहत आहेत. दिनांक 16/09/2021 चे 22.00 वा. ते 22.30 वा. दरम्यान 8 वर्ष जूने भांडणाचे कारणावरून आरोपी क्र. 1. सचिन बंडु सोनडवले, 2. नंदलाल आवारी सोनडवले, 3. अरूण सर्जेराव पाटील व 4. राजकुमार मधुकरजी पिलनकर सर्व रा. रेलवेस्टेशन झोपडपटटी मंगळवारी उमरेड यांनी फिर्यादीचे राहते घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीतांनी कपाट व त्यातील ठेवलेले सामानाची तोडफोड केली. तसेच व्हीडीओकॉन कंपनीचा टीव्हीची तोडफोड केली. तसेच एमएच- 40/यु- 4784 क्रमांकाची मोटरसायकल बजाज कंपनीची पल्सर गाडीची तोडफोड केली. इंडीयन कंपनीचे गॅस सिलेंडर चे 2 हंडे गॅस शेगडी घेउन गेले. तसेच इलेक्ट्रीक मीटरची तोडफोड केलीव फिर्यादीचे घराचे समोर राहणारे भैस्वाल रात्रे यांचे घराची तोडफोड केली व त्यांचे घराची टीव्हीची तोडफोड केली. तसेच बाथरूमची तोडफोड केली तसेच दुसरे गल्लीत राहणारे राजकुमार ढेडी यांचे घराचे नुकसान करून त्यांचे घरातील इंडीयन कंपनीचे गॅस सिलेंडर घेवुन गेले. तसेच प्रभु रात्रे यांचे घराची तोडफोड केलेली आहे. याप्रकारे आरोपीतांनी फिर्यादीच्या घरातील 1,50,000/- रू. चा मुद्देमालाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 457, 380, 427, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास तारूदत्ता बोरसरे पोउपनी पोस्टे उमरेड मो क्र 9764118811 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. बेला :- अंतर्गत 7 कि. मी. अंतरावरील मौजा सोनेगाव लोधी येथे दिनांक 17/09/2021 चे 09:45 वा. ते 10.15 वा. दरम्यान एम.एच- 36/डी- 1326 क्रमांकाची मोटरसाकलचा चालक नामे- अमोल राजेन्द्र बिरे (मृतक), वय 33 वर्ष, रा. खापामानकर ता. केळापुर व त्याचा मोठा भाउ विकास राजेन्द्र बिरे सह हिंगणघाट वरून नागपुर कडे जात होते. त्यादरम्यान सोनेगाव जवळ एम.एच- 07/सी- 7516 क्रमांकाच्या एस.टी बस माल वाहुचा चालक आरोपी नामे- निळकंठ देवरावजी घोडाम, वय 42 वर्ष, रा. दाभा याने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकल चालकाला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक अमोल बिरे यांचा जागीच मृत्यु झाला व त्याचा भाउ विकास बिरे खापामानकर ता. केळापुर हा किरकोळ जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- दिलीप तुकाराम कडु वय 53 वर्ष रा सोनेगाव लोधी त.जि.नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री वाघोडे मो न. 7304210724 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर